तात्काळ

क्र.पोमसं/३१/३९-१/घबांअ/१८२/२०१८ मुंबई, दि.१६/०५/२०१८

**संदर्भ :-** १) शासन निर्णय, वित्त विभाग, क्र. घबांअ-२०१२/प्र.क्र.३०/२०१२/विनियम, दि.२०/०२/२०१५
२) शासन पत्र, क्र. घबांअ१२१८/प्र.क्र.३११/आस्था-१, दि.०४/०४/२०१९

**विषय :-** राज्यातील पोलीस दलातील अधिकारी / कर्मचारी यांना घरबांधणी अग्रिम मंजूर करण्याबाबत

*****

**परिपत्रक**

राज्यातील पोलीस दलातील अधिकारी / कर्मचारी यांच्या घरबांधणी अग्रिमाच्या अनुषंगाने महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन निर्णय क्र. घबांअ-२०१२/प्र.क्र.३०/२०१२/विनियम, दि. २०/०२/२०१५ मधील नियम ८ मधील अट क्र. ५ मध्ये पती, पत्नी दोघेही शासकीय कर्मचारी असले तरीही, त्यापैकी एकालाच (विहित मर्यादेत) घरबांधणी अग्रिम अनुज्ञेय राहील असे नमूद आहे. तसेच, नियम ८ मधील अट क्र. ६ मध्ये वरील सर्व प्रयोजनार्थ घेण्यात येणाऱ्या अग्रिमाकरिता घर/जमिन अर्जदाराच्या स्वत:च्या नावावर असणे आवश्यक राहील व ते भारतात कोठेही असले तरी अग्रिम अनुज्ञेय होईल. असे नमूद आहे.

२. तसेच, शासन अधिसूचना क्र. एचबीए १०७१/२१४३/७१/फ-१, दि.०१/०१/१९७२ मध्ये खालीलप्रमाणे नमूद असल्याचेही कळविले आहे.

This rule does not preclude the grant of an advance to Government servant who owns the land or house or both jointly with his/her spouse if otherwise admissible, provided both the Government servant and his / her spouse are willing to mortgage the land or house or both in favour of Grvernment as security for repayment of the advance. The application for grant of advance in such cases shall be accompanied by a letter from the Government servant that he/she will mortgage his/her share of the land or house or both jointly with his/her spouse as security for repayment of the advance. The applicant and his/her spouse will have to execute an agreement and Mortgage Bond in such forms as may by prescribed by Government.

३. सदर बाबत, शासन निर्णय, दि. २०/०२/२०१५ मधील नियम ८ (६) व शासन अधिसूचना दि.०१/०१/१९७२ मधील अटी या परस्पर विरोधी असल्याचे दिसत असून, शासन निर्णय दि.२०/०२/२०१८ नुसार दि.०१/०१/१९७२ ची अधिसुचना अधिक्रमित झाली आहे किंवा कसे याचा बोध होत नाही. यास्तव, सद्यस्थितीत सदनिका खरेदी करताना संयुक्तरित्या शासकीय कर्मचाऱ्याचे व त्याच्या पती/पत्नीचे नाव दस्तऐवजावर पक्षकाराचे नोंदीसमोर एकत्रित नोंदविले असता, यामध्ये

अ) शासकीय कर्मचाऱ्याचे नाव प्रथम व दुसरे त्याच्या पती/पत्नीचे नाव असल्यास,

ब) शासकीय कर्मचाऱ्याच्या पती/पत्नीचे नाव प्रथम व दुसरे शासकीय कर्मचाऱ्याचे नाव असल्यास

या दोन्ही परिस्थितीत घरबांधणी अग्रिम देय आहे किंवा कसे याबाबत शासनाकडे या कार्यालयाच्या दि. ०५/१२/२०१८ च्या पत्रान्वये मार्गदर्शन मागविले होते. उदाहरणादाखल समादेशक, राज्य राखीव पोलीस बल, गट क्र. ७, दौड यांच्या कार्यालयातील दोन कर्मचाऱ्यांची नावे शासनास पाठविलेल्या सदर पत्रामध्ये नमूद करण्यात आली होती.

४. सदर बाबत शासनाने त्यांच्या दि. ०४/०४/२०१९ च्या पत्रान्वये वित्त विभाग, शासन अधिसूचना क्र. एचबीए१०७१/२१४३/७१/फ-१/ दि.०१/०१/१९७२ सद्यस्थितीत सदर कर्मचाऱ्यांस लागू असून तसे वित्त विभाग, शासन निर्णय,

दि.२०/०२/२०१५ मधील परि.४ मध्ये नमूद करण्यात आलेले आहे. विभागाच्या प्रस्तावानुसार सदनिका खरेदी करतांना संयुक्तरित्या शासकीय कर्मचाऱ्याचे व त्याच्या पती / पत्नीचे नाव दस्तऐवजावर पक्षकाराचे नोंदीसमोर एकत्रित नोंदविले असल्याने विभागाच्या प्रस्तावातील अ व ब नुसार संयुक्त नावावर घर खरेदी करतांना अग्रिम धारकाचे नांव प्रथम अथवा व्दितीय क्रमांकावर असले तरीही अग्रिमधारकासह दस्तऐवजावरील इतर पक्षकारांनी सदर सदनिका गहाण ठेवण्यास ना-हरकत प्रमाणपत्र व विहित वैयक्तिक बंधपत्र आणि जामीनदारांचे बंधपत्र देऊन सदर घर शासनाकडे गहाण ठेवण्याच्या अटीअधीन व घरबांधणी अग्रिमाबाबत वित्त विभागाच्या शासन निर्णय दि. २०/०२/२०१५ तसेच, घरबांधणी अग्रिम नियम १९६२ (मुंबई वित्तीय नियम १३४, परिशिष्ट -२६) मधील तरतुदींची पूर्तता करण्याच्या अधीन अग्रिम मंजूर करता येते. असे कळविले आहे. तसेच, समादेशक, राज्य राखीव पोलीस बल, गट क्र. ७, दौंड यांच्या आस्थापनेवरील उदाहरणादाखल नमूद केलेलया कर्मचाऱ्यांना घरबांधणी अग्रिम मंजूर करण्यास्तव उपरोक्त नमूद परिच्छेद क्र. २ मधील वित्त विभागाच्या अभिप्रायाप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी, असेही नमूद केले आहे.

५. तथापि, या कार्यालयाकडून शासनास उपरोक्त प्रमाणे सादर करण्यात आलेल्या प्रस्तावामध्ये सदर दोन कर्मचाऱ्यांना उल्लेख फक्त उदाहरणादाखल देण्यात आला आहे. तथापि, शासनाने सदर बाबत श्री. डोके व श्री. एखंडे यांना घरबांधणी अग्रिम मंजूर करण्यास्तव उपरोक्त प्रमाणे कार्यवाही करण्यास मान्यता दिली आहे. सबब एखाद्या कर्मचाऱ्याची मिळकत पती - पत्नीच्या संयुक्त नावाने असल्यास (त्यांची / तिचे पती / पत्नी शासकीय नोकरीस असल्यास / नसल्यास) त्यांचे बाबतीतही समान कार्यवाही होणे अपेक्षित असल्यामुळे सदर बाबत मिळकत पती पत्नी दोहोंच्या नावावर संयुक्तपणे असल्यास घरबांधणीकरिता प्राप्त अर्ज (इतर लागू अटी व शर्तींची पूर्तता होत असल्यास) मंजूर करण्याबाबतची कार्यवाही करण्यात यावी.

६. खालील नमूद सर्व घटक प्रमुखांना असेही कळविण्यात येते की, शासनाकडून सातव्या वेतन आयोगाच्या मूळ वेतनाप्रमाणे घरबांधणी अग्रिमाची परिगणना करण्याबाबत सुधारित शासन निर्णय येईपर्यंत, शासनाच्या दि. २०/०२/२०१५ च्या शासन निर्णयाप्रमाणे घरबांधणी अग्रिमाची कार्यवाही करण्यात यावी.

७. तसेच, बऱ्याच घटक कार्यालयांकडून वारंवार सूचना देऊनही वेळेवर या कार्यालयाच्या खात्यावर मुद्दल वसूलीची रक्कम जमा करण्यात येत नाही, तसेच यू.टी.आर. क्रमांकही घरबांधणी अग्रिमाच्या सॉफ्टवेअरमध्ये वेळेवर अपडेट करण्यात येत नाही. त्यामुळे या कार्यालयाच्या स्तरावर सॉफ्टवेअरमध्ये दर्शविण्याल्या जाणाऱ्या रकमेचा व प्रत्यक्ष ॲक्सीस बँकेच्या घरबांधणी अगिमाच्या खात्यात जमा होणाऱ्या रकमेचा ताळमेळ घेणे शक्य होत नाही. तरी खालील सर्व घटक प्रमुखांना कळविण्यात येते की, सदरची कार्यवाही विहित कालावधीत न करणाऱ्या घटक कार्यालयातील संबंधितांविरुध्द शिस्तभंगाची कार्यवाही करण्यात येईल.

(अनुप कुमार सिंह)
विशेष पोलीस महानिरीक्षक (प्रशासन)
पोलीस महासंचालक यांचेकरिता

प्रति,

आयुक्त, राज्य गुप्तवार्ता विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई
सर्व पोलीस आयुक्त,(रेल्वेसह) (बृहन्मुंबई वगळून)
अपर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके, मुंबई/बिनतारी संदेश विभाग, पुणे/वाहतूक, मुंबई/ लोहमार्ग, मुंबई/रा.रा.पो.बल. मुंबई/गुन्हे अन्वेषण विभाग, पुणे/ दहशतवाद विरोधी पथक म.राज्य मुंबई
संचालक, महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक/महाराष्ट्र गुप्तवार्ता प्रबोधिनी, पुणे
सर्व परिक्षेत्रीय विशेष पोलीस महानिरीक्षक

विशेष पोलीस महानिरीक्षक, नक्षल विरोधी अभियान, नागपूर/विशेष सुरक्षा विभाग, दादर/फोर्सवन मुंबई/ नागरी हक्क संरक्षण, मुंबई /मोटार परिवहन,पुणे/रा.रा.पो.बल नागपूर/पुणे

पोलीस उप महानिरीक्षक, गडचिरोली परिक्षेत्र, कॅम्प नागपूर

सर्व पोलीस अधीक्षक (रेल्वेसह)

पोलीस अधीक्षक, बिनतारी संदेश, पश्चिम विभाग, पुणे/पूर्व विभाग, नागपूर/विशेष कृती दल नागपूर/नागरी दहशतवाद विरोधी प्रशिक्षण केंद्र, गोरेगांव, मुंबई

उपसंचालक, गुन्हे अन्वेषण प्रशिक्षण केंद्र, नाशिक

सर्व प्राचार्य, पोलीस प्रशिक्षण केंद्रे /अ.अ.प्र.के., नागपूर

सर्व समादेशक, राज्य राखीव पोलीस बल गट क्र. १ ते १६/राज्य आपत्ती प्रतिसाद दल, नागपूर/ धुळे

अपर उपआयुक्त, राज्य गुप्तवार्ता विभाग, कोंकण, नवी मुंबई / पुणे / कोल्हापूर / औरंगाबाद / नांदेड / नागपूर / नाशिक / अमरावती

पोलीस अधीक्षक, गुन्हे अन्वेषण विभाग, पुणे / अमरावती / नागपूर / औरंगाबाद/कोंकण भवन, नवी मुंबई/नाशिक / कोल्हापूर